दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

वेस्ट इंडिजची चौथ्या सामन्यात भारताला नमवून 2-2 ने बरोबरी

मुंबई : वेस्ट इंडिजने चौथ्या टी20 सामन्यात भारताला नमवून मालिका विजयाच्या आशा कायम ठेवल्या आहेत. या मालिकेत चौथ्या सामन्यानंतर 2-2 अशी स्थिती झाली आहे. त्यामुळे पाचव्या टी20 सामन्यात विजयी संघ मालिका खिशात घालणार आहे. चौथ्या टी20 सामन्यात नाणेफेकीचा कौल भारताच्या बाजूने लागला आणि कर्णधार श्रेयस अय्यरला मनासारखा निर्णय घेता आला. त्याने खेळपट्टीचा अंदाज घेऊन प्रथम गोलंदाजी करणं पसंत केलं.

बिहारमध्ये बोट उलटली; 13 जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती

बिहार : बिहारमधील वैशाली जिल्ह्यातील हाजीपूरजवळ गंगा नदीत प्रवाशांनी भरलेली बोट उलटल्याची दुर्घटना घडली आहे. मंगळवारी (13 ऑक्टोबर 2026) संध्याकाळी राघोपूर परिसरातील रामपूर गावाजवळ ही घटना घडली. या नावेत 35 ते 40 प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती आहे. या दुर्घटनेत 13 जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त समोर आले असून, मृतांमध्ये लहान मुलांची संख्या अधिक असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, मृतांचा नेमका आकडा अधिकृतरीत्या स्पष्ट होणे बाकी आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १७४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

टाटा सॉल्ट हिमालयन रॉक सॉल्टचे वैशिष्ट्य

मुंबई : भारतीय परंपरेत रॉक सॉल्टला (सेंधव मीठ) विशेष महत्त्व आहे. नैसर्गिक खनिजांमुळे या मिठाला विविध रंग प्राप्त होतात. टाटा सॉल्ट हिमालयन रॉक सॉल्टमध्ये पोटॅशियम, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम यांसारखी खनिजे अल्प प्रमाणात असतात. कंपनीच्या म्हणण्यानुसार, नुकत्याच झालेल्या प्रयोगशाळा तपासणीत हे उत्पादन लागू गुणवत्ता आणि सुरक्षितता मानकांनुसार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच, त्यामध्ये कृत्रिम अन्नरंग नसल्याचेही तपासणीत आढळले. नैसर्गिक घटकांना प्राधान्य देणाऱ्या ग्राहकांसाठी हे उत्पादन एक पर्याय म्हणून उपलब्ध आहे.

ग्रामीण मुलींच्या शिक्षणासाठी मदत

नवी दिल्ली: जयपूर रग्सने वार्षिक विशेष सेल २०२६ जाहीर केला असून, ग्राहकांना विविध डिझाइन्सच्या रग्सवर ६०% पर्यंत सूट मिळणार आहे. या सेलमधून मिळणाऱ्या उत्पन्नातील काही भाग ग्रामीण मुलींच्या शिक्षणासाठी सायकल निधीला दिला जाणार आहे. या संग्रहात हाताने विणलेले रग्स, धुरी, सपाट विणकामातील रग्स आणि डिझायनर संग्रहांचा समावेश आहे. या उपक्रमातून आकर्षक डिझाइन्स आणि भारतीय हस्तकलेला प्रोत्साहन देण्यासोबतच ग्रामीण मुलींचा शाळेपर्यंतचा प्रवास सुलभ करण्याचा प्रयत्न कंपनीने केला आहे.

नवीन सुविधा महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला गती

नाशिक : भारतातील आघाडीची सप्लाय चेन आणि लॉजिस्टिक्स कंपनी सेफएक्सप्रेसने महाराष्ट्रातील नागपूर येथे आपल्या अत्याधुनिक लॉजिस्टिक्स पार्कचे उद्घाटन केले आहे. अमरावती रोडजवळ, राष्ट्रीय महामार्ग, (एनएच-53), धामना, नागपूर येथे मोक्याच्या ठिकाणी उभारण्यात आलेली ही नवीन सुविधा म्हणजे या प्रदेशातील लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. उद्घाटन समारंभाला सेफएक्सप्रेसचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते 11 लाख चौरस फूट क्षेत्रफळावर विस्तारलेला नागपूर लॉजिस्टिक्स पार्क अत्याधुनिक ट्रान्सशिपमेंट आणि थर्ड-पार्टी लॉजिस्टिक्स (3PL) सुविधांनी सुसज्ज आहे.

पीबी मनी आणि पैसाबाजार आता बॉण्डमधील गुंतवणूक अधिक सुलभ करणार आहेत.

मुंबई : पीबी मनीला नुकताच भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ कडून ऑनलाइन बॉण्ड प्लॅटफॉर्म प्रोव्हायडर परवाना मिळाला आहे. यामुळे पीबी मनी गुंतवणूकदारांना नोंदणी आणि केवायसीपासून ते बॉण्डची माहिती, पर्यायांचे मूल्यांकन, गुंतवणुकीचे आदेश, पेमेंट आणि गुंतवणुकीनंतरच्या सेवांपर्यंतची संपूर्ण बॉण्ड गुंतवणूक प्रक्रिया एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देऊ शकेल. पीबी मनीवरील गुंतवणूकदार बॉण्ड यील्ड (परतावा), क्रेडिट रेटिंग आणि किमान गुंतवणुकीची रक्कम यांसारख्या मापदंडांच्या आधारे विविध पर्यायांची तुलना करू शकतील.

विवोचे ओरिजिनओएस 7 सादर

नवी दिल्ली: विवो इंडियाने आज आपली नवीनतम ऑपरेटिंग सिस्टीम, ओरिजिनओएस ७ सादर केली, जी सुधारित कार्यक्षमता, इंटेलिजेंट उत्पादकता आणि अखंड कनेक्टिव्हिटीद्वारे प्रीमियम स्मार्टफोनचा अनुभव वाढवण्यासाठी डिझाइन केली आहे. 'सोपे', 'स्मार्ट' आणि 'कनेक्टेड' या तीन मुख्य अनुभवांवर आधारित, ओरिजिनओएस ७ सुधारित सिस्टीम कार्यक्षमता, एआय-शक्तीवर चालणारी उत्पादकता, क्रॉस-डिव्हाइस कनेक्टिव्हिटी, पर्सनलायझेशन आणि वर्धित सुरक्षा एकत्र आणते, जेणेकरून वापरकर्त्यांना त्यांच्या विवो स्मार्टफोनचा अधिक चांगला वापर करता येईल.

"शाल जोडे"



शिक्षकांचा मोठा भेदभाव : मराठी शाळेत 14 शिक्षक तर उर्दू शाळेत अवघे तीनच; पालकांमध्ये संतापाची लाट

फर्दापूर प्रतिनिधी शेख हक्कानी

फर्दापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मराठी आणि उर्दू माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या आणि शिक्षकांच्या उपलब्धतेबाबत मोठा विरोधाभास व भेदभाव समोर आला आहे याप्रकरणी प्रशासनाच्या कारभारावर पालकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात असून वरच्या अधिकाऱ्यांना या गोष्टीची माहिती नाही का अधिकारी झोपले आहेत का असा संतप्त सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे

नेमकी परिस्थिती काय

मिळालेल्या माहितीनुसार फर्दापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत मराठी माध्यम आठवीपर्यंतचे वर्ग असून तिथे ४६५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शाळेत तब्बल १४ शिक्षक कार्यरत आहेत

याचउलट त्याच परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळेत



उर्दू माध्यम पाचवीपर्यंत वर्ग असून तिथे १८५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत मात्र एवढ्या मोठ्या विद्यार्थी संख्येसाठी या शाळेत केवळ ३ च शिक्षक देण्यात आले आहेत

पालकांचा संतप्त सवाल पाच वर्ग आणि फक्त तीन शिक्षक कसे शिकवणार

फक्त पाचवीपर्यंत असलेल्या उर्दू माध्यमाच्या शाळेत १८५ मुलांसाठी अवघे तीनच शिक्षक असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे एका शिक्षकावर दोन दोन वर्ग आणि शेकडो विद्यार्थ्यांची जबाबदारी ढकलल्यास मुलांच्या शिक्षणाचे काय हाल होत असतील असा सवाल पालक विचारत आहेत

मराठी शाळा आहे तर १४ शिक्षक आणि उर्दू माध्यम आहे तर फक्त ३ च शिक्षक हा उघडपणे भेदभाव कशासाठी असा गंभीर प्रश्न आता पालकांकडून उपस्थित केला जात आहे उर्दू शाळांमधील शिक्षक संख्या अपुरी असल्याबाबत शिक्षण विभागाच्या वरिष्ठांना कल्पना नाही का की अधिकारी कुंभकर्णी झोपेत आहेत असा संताप पालकांनी व्यक्त केला आहे शासनाने आणि शिक्षण विभागाने तात्काळ या प्रकरणात लक्ष घालून उर्दू माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांची पदे लवकरात लवकर भरावीत अन्यथा पालकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे

किशोर शितोळे यांच्या पुढाकारातून रिक्षाचालकांना मोफत अपघात विमा

देवगिरी बँकेतर्फे क्यूआर कोडचे वाटप; रिक्षांमध्ये डस्टबिन देऊन स्वच्छतेचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी : देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांच्या पुढाकारातून शहरातील रिक्षाचालकांसाठी विशेष कर्ज व ठेव योजनांचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत बँकेत खाते उघडणाऱ्या रिक्षाचालकांना मोफत अपघाती विमा संरक्षण देण्यात आले. तसेच डिजिटल व्यवहार सुलभ करण्यासाठी क्यूआर कोड आणि शहरात स्वच्छता राखण्यासाठी रिक्षांमध्ये लावण्याकरिता मोफत डस्टबिनचे वाटप करण्यात आले.

रिक्षाचालकांना प्रवाशांकडून भाड्याचे पैसे स्वीकारताना सुट्ट्या पैशांची अडचण येऊ नये, तसेच रोख रकमेऐवजी डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने क्यूआर कोड देण्यात आले. या माध्यमातून प्रवाशांना थेट बँक खात्यात पैसे जमा करता येणार असून,



रिक्षाचालकांना आर्थिक व्यवहार सुलभ करण्यासह बचतीची सवय लावण्यास मदत होणार आहे.

शहरातील स्वच्छता राखण्यासाठी रिक्षाचालकांनी 'स्वच्छता दूत' म्हणून काम करावे, या उद्देशाने रिक्षांमध्ये लावण्यासाठी छोटे डस्टबिन मोफत देण्यात आले. प्रवाशांनी रस्त्यावर कचरा न टाकता डस्टबिनचा वापर करावा, यासाठी रिक्षाचालकांनी जनजागृती करावी, असे आवाहन करण्यात आले. या उपक्रमामुळे स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाच्या कार्याला हातभार लागणार आहे.

कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विशाल दरगड यांनी ग्राहक आणि रिक्षाचालकांमधील कौटुंबिक व जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ करण्याचे आवाहन केले.

या वेळी बँकेचे संचालक नागनाथ आप्पा काजळे, सुरेश जगाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, दत्ता शिंदे, संदीप औटी, रेणुका घोटणकर, जाणता राजा रिक्षा संघटनेचे अध्यक्ष किशोर माळी, जिल्हाध्यक्ष अनंत कुलकर्णी यांच्यासह शहरातील रिक्षाचालक उपस्थित होते.

भटक्या-विमुक्तांच्या पुनर्वसनासाठी एक रुपयात जागा देणार

29 ऑक्टोबरपर्यंत जागांचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

मुंबई : पालावर आणि तात्पुरत्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या भटक्या-विमुक्त समाजाच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी नाममात्र एक रुपयात जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. या प्रस्तावाला गती देऊन तो तातडीने मंत्रिमंडळासमोर सादर करावा, तसेच जागा उपलब्ध नसलेल्या ठिकाणांसाठी पर्यायी जागांचे प्रस्ताव २९ ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत, असे आदेश त्यांनी दिले. बैठकीतील सूचनांची अंमलबजावणी करण्यात दिरंगाई होत असल्याबद्दल त्यांनी अधिकाऱ्यांवर नाराजीही व्यक्त केली.

इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची सातवी बैठक सह्याद्री अतिथीगृहात बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीला मंत्री छगन भुजबळ, गणेश नाईक, पंकजा मुंडे, गुलाबराव पाटील, अतुल सावे आणि संजय राठोड यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

भटक्या-विमुक्त समाजातील नागरिकांना जात प्रमाणपत्रे आणि अन्य आवश्यक दाखले उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी नवीन वसाहती उभारण्याच्या दृष्टीने जागा निश्चित करण्याच्या सूचना बावनकुळे यांनी दिल्या. बैठकीत निर्णय होऊनही संबंधित विभागांकडून प्रस्ताव वेळेत सादर केले जात नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या कामकाजात दिरंगाई होत असल्याचे नमूद करत, संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या मुदतीत कार्यवाही पूर्ण करावी, असे त्यांनी बजावले.

राज्यातील मेंढपाळांच्या चराई क्षेत्राचा प्रश्नही बैठकीत चर्चेला आला. महसूल आणि वन विभागाच्या शासन निर्णयानुसार, राज्यातील २१ वनविभागांमध्ये जून ते सप्टेंबर या कालावधीत मेंढी चराईसाठी कायदेशीर परवानगी देण्यात आली आहे. वनक्षेत्र उपलब्ध नसलेल्या अन्य २७ वनविभागांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार चराईसाठी जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश आहेत. दुष्काळी परिस्थितीत चाऱ्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन ड्रोन सर्वेक्षणाद्वारे चाऱ्याच्या उपलब्धतेचा आढावा घ्यावा आणि जिल्हा नियोजन व विकास समितीच्या (डीपीडीसी) निधीतून चारा उपलब्ध करून द्यावा, अशी सूचना वनमंत्री गणेश नाईक यांनी केली.

स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या हस्ते जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचा शुभारंभ



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा २०२६-२७ चा शुभारंभ महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या हस्ते करण्यात आला. या स्पर्धेत मोठ्या संख्येने खेळाडूंनी सहभाग नोंदवला असून, स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

शुभारंभप्रसंगी व्हॉलीबॉल सचिव सतीश पाठक, प्राध्यापक डॉ. आदित्य जोशी, महेश भावसार, जब्बार पठाण, प्रफुल्ल कुलकर्णी, सोमनाथ पचलुरे, लोकेश ठाकरे, राजू बिनवाल, अभिषेक गणोरकर, सागर वाघ आणि प्रवीण वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सभापती अनिल मकरिये यांनी सहभागी खेळाडूंशी संवाद साधून त्यांना प्रोत्साहन दिले.क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संघभावना, आत्मविश्वास आणि खिलाडूवृत्ती विकसित होते. तसेच नवोदित खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वाचे व्यासपीठ ठरतात, असे त्यांनी नमूद केले. केंद्र सरकारच्या 'खेलो इंडिया' उपक्रमाच्या माध्यमातून देशातील क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासह तळागाळातील गुणवंत खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धांसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळांविषयी आवड निर्माण होऊन भविष्यातील गुणवंत खेळाडू घडण्यास मदत होते. खेळाडूंनी अभ्यासासोबतच क्रीडाक्षेत्रातही प्रगती साधून जिल्ह्याचे आणि राज्याचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

दिवाळीपूर्वी मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करा

थकबाकीदारांचा कचरा उचलणे बंद करा, पाणीपुरवठा खंडित करा; आयुक्त अमोल येडगे यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : दिवाळीपूर्वी मालमत्ता कराच्या बिलांचे वाटप पूर्ण करून नवीन कर आकारणीतील मागणी आणि वसुलीचे उद्दिष्ट साध्य करा. कर थकबाकीदारांकडून वसुली करताना हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात येईल, असा इशारा महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी दिला.

महानगरपालिकेच्या स्मार्ट सिटी कार्यालयात बुधवारी सकाळी ११ वाजता मालमत्ता कर वसुलीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. या बैठकीला झोन क्रमांक १ ते १० मधील सहाय्यक आयुक्त, वसुली अधीक्षक आणि बिल कलेक्टर उपस्थित होते. आयुक्त येडगे यांनी वसुलीचा आढावा घेत दिवाळीपूर्वी निर्धारित उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

शहरातील सुमारे १ लाख ६७ हजार मालमत्ताधारकांकडे



कराची थकबाकी आहे, तर सुमारे १ लाख ४५ हजार मालमत्ताधारक नियमितपणे कर भरतात. या दोन्ही गटांतील मालमत्ताधारकांकडून प्रभावीपणे कर वसुली करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. तसेच नवीन कर आकारणी झालेल्या मालमत्तांचे डिमांड तयार करून त्यानुसार वसुलीला गती द्यावी, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

थकबाकीदारांवर कठोर कारवाई

मोठ्या प्रमाणात मालमत्ता कर थकविणाऱ्या रहिवाशांना संधी देऊनही त्यांनी कर भरला नाही, तर त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. संबंधित थकबाकीदारांची कचरा संकलन सेवा बंद करण्यासह पाणीपुरवठा खंडित करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश आयुक्तांनी दिले. खुल्या भूखंडावरील कर आणि इतर आकारणी थकविल्यास संबंधित भूखंडावर नियमानुसार बोजा चढविण्याची प्रक्रिया राबवावी. कर वसुलीसाठी शनिवारीही वसुली आणि मालमत्ता सील करण्याची कारवाई सुरू ठेवण्याचे आदेश त्यांनी दिले.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार

मालमत्ता कर वसुलीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बिल कलेक्टर, वसुली अधीक्षक, इमारत निरीक्षक आणि सहाय्यक आयुक्तांचा आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये अभिमान भारसाकडे, रवींद्र परदेशी, परबल बकले, नासीर खान, श्रीपाद सुभेदार, सिद्धार्थ कलारे, कर अधीक्षक अविनाश मद्दी, इमारत निरीक्षक कुणाल भोसले आणि सहाय्यक आयुक्त अर्चना राजपूत यांचा समावेश होता.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता बातमीचा परिणाम; ग्रामपंचायतीने घेतली दखल, कारवाईला सुरुवात

अजिंठा प्रतिनिधी सय्यद जमीर

मोकाट कुत्र्यांचे सर्वेक्षण पूर्ण; काही दिवसांतच भटक्या कुत्र्यांचे नि बि जीकरण व रेबीज लसीकरण मोहीम करुन पुन्हा त्यांच्या मुळ अधिवासात सोडले जाणार

सिल्लोड तालुक्यातील शिवना गावात वाढलेल्या मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवाबाबत दैनिक हिंदू प्रकाशवार्ता बातमी प्रकाशित होताच शिवना ग्रामपंचायतीने तातडीने दखल घेत कारवाईला सुरुवात केली आहे. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने डब्लू वी.एस होप व मिशन रेबीजच्या पथकाने संपूर्ण गावात फिरून मोकाट कुत्र्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे.

याबाबत डब्लू वी.एस होप व मिशन रेबीजचे अधिकारी दिनेश सुखधान यांनी सांगितले की, शिवना गावातील मोकाट कुत्र्यांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. आगामी काही दिवसांत वाहनासह पथक गावात दाखल होऊन मोकाट कुत्र्यांना पकडून त्यांची नि बि जीकरण व रेबीज लसीकरण करुन पुन्हा त्यांच्या मुळ अधिवासात सोडले जाणार आहे.यांची संपूर्ण माहीती मा.



ग्रामसेवक अधिकारी, मा. सरपंच व नागरिकांना देण्यात आली.

गावात मोकाट कुत्र्यांची संख्या वाढल्याने नागरिक, शाळकरी विद्यार्थी, महिला तसेच दुचाकीस्वारांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे ग्रामपंचायतीने घेतलेल्या या निर्णयामुळे नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता बातमीची ग्रामपंचायतीने तातडीने दखल घेत कारवाई सुरू केल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

यावेळी पंचायत समिती सदस्य शेख सलीम, माजी सरपंच डॉ. सलमान खान, शिवना ग्रामविकास अधिकारी रवी गंगावणे, माजी ग्रामपंचायत सदस्य रजीक सेठ, हाश्मी सर, पत्रकार शेख मुर्शरफ, सय्यद जमीर, जहीर कुरेशी, ग्रामपंचायत कर्मचारी अमोल, गजु काळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सं पा द की य

मराठा आरक्षणाचा पाठपुरावा, समाजहित आणि प्रशासकीय गती

मराठा समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या बैठकीत केवळ शासन निर्णयांचा पाढा वाचला गेला नाही, तर मराठा समाजातील विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन आतापर्यंत झालेल्या कामांचा आणि भविष्यातील रणनीतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. महायुती सरकारने मराठा समाजाला दिलेले १० टक्के विशेष आरक्षण (SEBC) न्यायालयात भक्कमपणे टिकवणे, कुणबी दाखल्यांचे वितरण वेगाने करणे आणि 'सारथी' व 'अण्णासाहेब पाटील महामंडळा'च्या माध्यमातून तरुणांना आर्थिक व शैक्षणिक आधार देणे, या सर्व आघाड्यांवर शासनाने दाखवलेली प्रशासकीय तत्परता अत्यंत आश्वासक आणि सकारात्मक पाऊल आहे. राज्यात आतापर्यंत ५२ लाखांपेक्षा अधिक कुणबी प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली असून, विशेषतः मराठवाड्यात या प्रक्रियेला मोठी गती मिळाली आहे. न्यायमूर्ती शिंदे समितीला जून २०२७ पर्यंत मिळालेली मुदतवाढ आणि हैद्राबाद गॅझेटिअरच्या आधारे नोंदी शोधण्याचे सुरू असलेले काम यामुळे खऱ्या गरजूंना त्यांचे हक्क मिळण्यास मदत होत आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, न्यायालयीन लढाईत नामांकित विधिज्ञांची फौज उभी करून १० टक्के आरक्षण टिकवून ठेवण्यासाठी २३ ऑक्टोबर २०२६ च्या आगामी सुनावणीसाठी शासनाने तयारी पूर्ण केली आहे. याशिवाय, आरक्षणाच्या आंदोलनात हुतात्मा झालेल्या ३०९ व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी १० लाखांची मदत, एसटी व एमआयडीसीमध्ये नोकऱ्या आणि ओबीसी प्रवर्गाप्रमाणेच मराठा विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती व वसतिगृह भत्ता लागू करण्याचा निर्णय हा केवळ घोषणाबाजी न राहता प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. सध्याच्या टप्प्यावर सर्वात मोठे आव्हान हे या निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणीचे आहे. ५४ हून अधिक योजनांच्या माध्यमातून 'सारथी'ने हजारो विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व उच्च शिक्षणासाठी दिलेला आधार आणि अधिसंख्य पदे निर्माण करून १,५५३ उमेदवारांना दिलेल्या नोकऱ्या यातून प्रशासकीय संवेदनशीलता दिसून येते. तरीही, स्थानिक पातळीवर जात पडताळणी किंवा शैक्षणिक सवलती मिळवताना विद्यार्थ्यांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी जिल्हास्तरीय हेल्पलाईन आणि दक्षता यंत्रणा अधिकाधिक सक्षम करावी लागेल. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन, संवाद कायम ठेवत आणि कायदेशीर लढाई ताकदीने लढूनच मराठा समाजाला न्याय मिळवून देण्याचे सरकारचे ध्येय पूर्णत्वास जाऊ शकते.

आज जर पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरला नाही, तर उद्या पश्चात्तापाचे अश्रू ढाळायलाही डोळ्यात पाणी उरणार नाही!

हिंदू प्रकाश वार्ता/अशोक पवार

*ऑक्टोबर २०२६ मध्येच, आपल्या महाराष्ट्राच्या छाताडावर ७५% पाणीटंचाईचे भयानक भूत येऊन बसले आहे!

अजून उन्हाळा यायचा बाकी आहे! जरा शांतपणे बोटांवर मोजा आणि कॅलेंडरचा हा हिशोब बघा:

• १) ऑक्टोबर (पावसाळा संपतानाच कोरड!) • २) नोव्हेंबर (थंडीची सुरुवात, पण धरणात पाणी नाही) • ३) डिसेंबर (गुलाबी थंडी, पण चिंतेचे ढग) • ४) जानेवारी २०२७ (नवीन वर्षाची सुरुवात टंचाईने) • ५) फेब्रुवारी (विहिरींची पातळी खाली) • ६) मार्च (उन्हाचा चटका आणि पाण्याचा टंचाईचा झटका) • ७) एप्रिल (रखरखते उन्हाळे आणि टँकरची वाट) • ८) मे (पाण्याच्या एका-एका थेंबासाठी जीवन-मरणाचा संघर्ष!)

सलग ८ महिने... म्हणजेच तब्बल २४० दिवस!

विचार करा, हे पुढील आठ महिने आपण कसे काढणार आहोत? आठ महिने म्हणजे काही लहान सहान काळ नाही.

आणि एक सर्वात मोठा भ्रम डोक्यातून काढून टाका— "दुष्काळ हा फक्त शेतकऱ्यांचा विषय आहे, आपला काय संबंध?"

पाणी वाचवण्याचे फंडे (आजपासूनच मिशन मोडवर लागू करूयात!)

१. 'अर्धा ग्लास' पाहुणचार फंडा:

आपल्याकडे घरी पाहुणा आला की आपण आदरातिथ्य म्हणून तांब्या भरून किंवा मोठा फुल ग्लास पाणी देतो. पाहुणा त्यातले दोन घोट पितो आणि उरलेले पाऊण ग्लास पाणी सरळ बेसिनमध्ये ओतून दिले जाते.

• **फंडा:** इथून पुढे घरी आलेल्या प्रत्येक व्यक्तीला सुरुवातीला अर्धाच ग्लास पाणी देऊयात. नम्रपणे सांगूया, "पाणी मौल्यवान आहे, तुम्हाला अजून हवे असेल तर नक्की सांगा." पाहुणाही खूश आणि उरलेले हजारो लिटर पाणी वाया जाण्यापासून वाचेल!

२. 'एक बादली' चॅलेंज (शॉवर ला कायमची गोळी मारूया!):

शॉवरखाली उभे राहून मस्त गाणी गात आंघोळ करताना किती शेकडो लिटर पाणी वाहून जाते, याचा आपल्याला अंदाजच येत नाही.

• **फंडा:** पुढील आठ महिने शॉवर पूर्णपणे बंद! फक्त एक बादली आणि एक तांब्या. एका माणसाच्या आंघोळीमागे रोज किमान ३० ते ४० लिटर पाणी वाचते. घरात ४ माणसे असतील तर रोज १५० लिटर पाण्याचे नेट सेव्हिंग!

३. RO च्या पाण्याचा 'रिव्हर्स' मास्टरस्ट्रोक:

आपल्या घरातील वॉटर प्युरिफायर (RO) १ लिटर पिण्याचे पाणी शुद्ध करण्यासाठी तब्बल ३ लिटर वेस्ट पाणी बाहेर टाकून देतो. आपण ते पाणी पाईपद्वारे थेट बेसिनमध्ये सोडून देतो.

• **फंडा:** तो वेस्ट पाण्याचा पाईप एका मोठ्या कॅनमध्ये किंवा बादलीत सोडूया. ते पाणी अजिबात घाण नसते! ते पाणी फरशी (पोछा) पुसण्यासाठी, भांडी घासण्यासाठी, कपडे धुण्यासाठी किंवा संडासच्या फ्लशसाठी वापरता येईल..काय बरोबर ना!

४. 'बेसिन लिकेज' आणि शेव्हिंग-ब्रश कट:

सकाळी ब्रश करताना किंवा दाढी करताना नळ धोधो चालू ठेवण्याची अनेकांना सवय असते.

• **फंडा:** शेव्हिंग करताना एका मगमध्ये पाणी घ्या. ब्रश करताना दात घासेपर्यंत नळ पूर्ण बंद ठेवा, फक्त तोंड धुण्याच्या वेळीच नळ चालू करा. या एका छोट्या सवयीने कुटुंबाचे रोज ५० लिटर पाणी वाचवण्याचा प्रयत्न करूया.

५. 'गाडी धुणे बंद, फक्त ड्राय क्लिनिंग चालू!':

सकाळी उठून पाईप लावून धोधो पाण्याने गाडी धुणे म्हणजे सध्याच्या परिस्थितीत पाण्याचा खून करण्यासारखे आहे.

• **फंडा:** गाडी/आपली वाहने धुण्यासाठी पाईप वापरणे पूर्ण बंद करूया! आठवड्यातून एकदा किंवा दोनदा एका लहान बादलीत पाणी घेऊन ओल्या फडक्याने आपली वाहने पुसून घेऊया. आपली वाहने थोडी कमी चमकली तरी चालेल भाऊ, पण निसर्गाचे आणि आपले भविष्य नक्कीच चमकून निघेल.

६. 'भाजी-तांदूळ' वॉटर बँक:

घरात आई, बायको किंवा बहीण भाजी धुते, तांदूळ-डाळ धुते, ते पाणी आपण थेट बेसिनच्या गटारात सोडून देतो.

• **फंडा:** स्वयंपाकघरात भाजी आणि धान्य धुतलेले पाणी एका वेगळ्या घमेल्यात साठवून ते पोषक पाणी गच्चीवरील किंवा गॅलरीतील कुंडीतल्या झाडांना घालूया. झाडांना नैसर्गिक खत-पाणी मिळेल आणि आपले नळाचे अनमोल पाणी वाचेल!

७. 'थेंब-थेंब' लिकेजवर सर्जिकल स्ट्राइक:

आपल्या घरातील किंवा इमारतीतील नळातून जर 'टिप-टिप' पाणी गळत असेल, तर आपण "अरे जाऊ दे, थेंबच तर गळतोय" म्हणून दुर्लक्ष करतो.

• **फंडा:** तो एक-एक थेंब २४ तासांत अख्खी २० लिटरची बादली भरतो! आजच प्लंबरला बोलावून आणि घरातील सर्व गळती बंद करूया. प्लंबर मिळेपर्यंत त्या नळाखाली एखादे भांडे ठेऊन, ते साठलेले पाणी वापरात आणूया.

८. फ्लश टँकमध्ये 'एक लिटरची बाटली' फंडा:

आपण एकदा फ्लश केला की टँकमधून थेट ८ ते १० लिटर पाणी वाहून जाते.

• **फंडा:** प्लास्टिकच्या १ लिटरच्या बाटलीत पाणी किंवा वाळू भरा, तिचे झाकण कडक लावा आणि ती बाटली तुमच्या फ्लश टँकच्या आत ठेवून द्या. यामुळे प्रत्येक वेळी फ्लश करताना १ लिटर पाणी कमी वापरात येईल आणि टँकचे कामही होईल!

मित्रांनो, निसर्गाने आपल्याला यंदा वेळेच्या आधीच कडक इशारा दिला आहे. अजूनही आपल्याकडे वेळ आहे. हे उरलेले पावसाचे दिवस आणि येणारे आठ महिने जर आपण संयमाने आणि युक्तीने पाणी वापरले, तरच आपण या संकटातून सहीसलामत बाहेर पडू शकू.

शेवटचा कडक मंत्र:

"आज जर पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरला नाही, तर उद्या पश्चात्तापाचे अश्रू ढाळायलाही डोळ्यात पाणी उरणार नाही!"

पाणी वाचवा..!

पिंपरीराजा येथे CPHC प्रशिक्षणातून प्राथमिक आरोग्य सेवा बळकट

PHFI चे अतिरिक्त संचालक दिलीप झा यांच्याकडून प्रशिक्षणाच्या गुणवत्तेचे कौतुक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' आणि 'सेवा संकल्प अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी पिंपरीराजा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्वंकष प्राथमिक आरोग्य सेवा (CPHC) प्रशिक्षणाच्या बॅच क्रमांक २२ च्या पहिल्या दिवसाचे प्रशिक्षण पार पडले. या प्रशिक्षणात ६७ प्रशिक्षणार्थी आणि ९ प्रशिक्षक सहभागी झाले. प्रशिक्षणाला दिल्ली येथील पब्लिक हेल्थ फाउंडेशन ऑफ इंडिया (PHFI) चे अतिरिक्त संचालक दिलीप झा यांनी भेट देत प्रशिक्षणार्थींच्या ज्ञानाची पडताळणी केली. तसेच प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि शिकविण्याच्या पद्धतीचे कौतुक केले.ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, स्थानिक पातळीवर आरोग्यविषयक गरजा पूर्ण करणे आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची कौशल्ये विकसित करणे, हा प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश आहे. 'Resolve More, Refer Less' अर्थात रुग्णांना अन्यत्र पाठविण्यापेक्षा प्राथमिक स्तरावरच अधिकाधिक आजारांचे निदान व उपचार करण्यावर प्रशिक्षणात विशेष भर देण्यात आला.प्रशिक्षणामध्ये माता-बाल आरोग्य, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार, मानसिक आरोग्य, पॅलिएटिव्ह केअर, मौखिक आरोग्य, आपत्कालीन सेवा, योग व आयुष यांसह सर्वंकष प्राथमिक आरोग्य सेवेच्या १३ प्रमुख घटकांवर मार्गदर्शन करण्यात आले. दिलीप झा यांनी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधत विविध विषयांवरील त्यांचे ज्ञान आणि आकलन तपासले. प्रशिक्षणार्थींनी दिलेल्या प्रतिसादावर समाधान व्यक्त करत त्यांनी प्रशिक्षणाच्या गुणवत्तेची प्रशंसा केली.यावेळी आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्राच्या साथरोगशास्त्रज्ञ डॉ. पल्लवी पगडाल, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी तथा प्रशिक्षण नोडल अधिकारी डॉ. छाया आवरगावकर, डॉ. विखे पाटील आणि डॉ. ज्ञानोबा भोसले यांनी प्रशिक्षणास भेट देऊन मार्गदर्शन केले.

क्षेत्रीय भेटीतून जनजागृती

प्रशिक्षणाचा भाग म्हणून प्रशिक्षणार्थींनी गावातील शाळा व महाविद्यालयांना भेट दिली. यावेळी शारीरिक आणि मानसिक आरोग्याविषयी व्याख्याने देऊन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच ग्राम संसद कार्यालयाला भेट देऊन नागरिकांना 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव', 'सेवा संकल्प अभियान' आणि 'तिशीचा पल्ला, तपासणी व सल्ला' या उपक्रमांसह विविध आरोग्य योजनांची माहिती देण्यात आली.प्रशिक्षणादरम्यान डॉ. राणी मुदगल, डॉ. महेश मरकड, डॉ. स्मिता जिघे, डॉ. आशिष वानखेडे, डॉ. प्रतिक्षा नेवसे, सुनील उन्हाळे, सखू शेलार, प्रणाली भांगे, शीतल देशमुख, शिवनाथ तावडे आणि संदीप पवार यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणात वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, गटप्रवर्तक आणि आशा स्वयंसेविका सहभागी झाल्या. डॉ. हाश्मी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे नियोजन शिवनाथ तावडे आणि सिद्धार्थ म्हस्के यांनी केले.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजारांची मदत

मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा

मुंबई : दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या हातात दिवाळीपूर्वी पैसे मिळावेत, यासाठी राज्य सरकार प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यात पाच हजार रुपये अग्रीम मदत म्हणून जमा करणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी हा निर्णय घेण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. केंद्र सरकारकडून दुष्काळी मदत मिळवण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया दिवाळीपूर्वी पूर्ण होणे कठीण असल्याने राज्य सरकारने हा पर्यायी निर्णय घेतल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. याशिवाय राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या २६५ वरून ३०५ करण्यात आली असून, दुष्काळ निवारणासाठीच्या १२ सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी दुष्काळी परिस्थितीचा आढावा आणि सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सर्व मंत्री उपस्थित होते. यापूर्वी राज्यात २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. मात्र, काही तालुक्यांमधून आलेल्या तक्रारींची दखल घेत 'ट्रिगर-१' आणि 'ट्रिगर-२' या दोन्ही निकषांचा पुन्हा आढावा घेण्यात आला. त्यानंतर आणखी ४० तालुक्यांचा समावेश करून एकूण ३०५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळामुळे बाधित झालेल्या भागांतील शेतकऱ्यांना १२ सवलतींचा लाभ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. गेल्या २५ वर्षांच्या नोंदी पाहिल्यास राज्यात साधारणपणे नोव्हेंबरच्या अखेरीस दुष्काळ जाहीर केला जात असे आणि त्यानंतर डिसेंबरमध्ये मदत दिली जात असे. यंदा मात्र परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दुष्काळ आधीच जाहीर करण्यात आला आणि त्यासंबंधीचा शासन निर्णय ऑक्टोबरमध्ये काढण्यात आला. बुधवारी पूरक शासन निर्णयही काढण्यात आला. मात्र, केंद्र सरकारकडून मदत मिळवण्यासाठी कायद्यानुसार ठरवलेले टप्पे आणि कालमर्यादा पूर्ण करावी लागते. त्यामुळे ही प्रक्रिया दिवाळीपूर्वी पूर्ण होणे कठीण आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून मंत्रिमंडळाने शेतकऱ्यांना तातडीने पाच हजार रुपये देण्याचा निर्णय घेतल्याचे फडणवीस यांनी सांगितले. दिवाळीपूर्वी ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा सरकारचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

साडेतीन लाख शेतकऱ्यांची कर्जमाफीची यादी प्रमाणित

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची प्रक्रिया थांबलेली नसून, पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्याचे काम सुरू आहे. नव्याने आणखी साडेतीन लाख शेतकऱ्यांची यादी प्रमाणित करण्यात आली असून, या यादीतील शेतकऱ्यांनाही लवकरच पैसे देण्यास सुरुवात होईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय हा कर्जमाफीच्या प्रक्रियेपासून स्वतंत्र असून, सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक आधार देणे हा त्यामागील उद्देश आहे.

टँकरचा 'जीपीएस'द्वारे मागोवा

दुष्काळग्रस्त भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई वाढत असल्याने टँकरची संख्या वाढवण्यात येत आहे. मराठवाड्यातील बहुतांश भागांमध्ये निरीक्षण विहिरींमधील पाण्याची पातळी जमिनीपासून तीन मीटरपेक्षा खाली गेली आहे. अशा परिस्थितीत ऑक्टोबर-नोव्हेंबरपासूनच टँकर सुरू करावे लागतात. त्यामुळे आवश्यकतेनुसार टँकर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यांचे जीपीएसच्या मदतीने मागोवा घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. पिण्यासाठी पाणी राखून ठेवता यावे, यासाठी पाणीपुरवठा व्यवस्थेतून पाणी घेतल्या जाणाऱ्या सुमारे १६ हजार अवैध जोडण्या तोडण्यात आल्या आहेत. यापुढेही कोणी अवैधरीत्या पाणी उपसा केल्यास त्याची जोडणी तोडण्यात येईल. हा निर्णय कठोर वाटू शकतो; मात्र दुष्काळी परिस्थितीत नागरिकांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध ठेवणे आवश्यक असल्याने तो घेण्यात आल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

सरसकट शैक्षणिक शुल्कमाफी लागू

शैक्षणिक शुल्कमाफीसंदर्भात यापूर्वी काढलेल्या शासन निर्णयात १९९२ पासूनच्या काही अटींचा समावेश असल्याने सर्व पात्र लाभार्थ्यांना त्याचा फायदा मिळत नसल्याचे सरकारच्या निदर्शनास आले होते. मंत्रिमंडळाने या अटी काढून टाकण्याचा निर्णय घेतला असून, शुल्कमाफीचा निर्णय आता सरसकट लागू करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

चारा लागवड केल्यास सरकार हमीभावाने खरेदी करणार

दुष्काळी भागांमध्ये जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता वाढवण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. मंत्रिमंडळाने चारा उपलब्धतेचा आढावा घेतला असून, काही भागांमध्ये सुमारे ९० दिवस पुरेल इतकाच चारा उपलब्ध आहे, तर काही भागांत सहा ते सात महिन्यांचा साठा आहे.

श्री रेणुकादेवी शरद साखर कारखाण्याचा गळीत हंगाम उत्साहात



पैठण दि १४ :- पैठण तालुक्यातील विहामांडवा चौढाळा येथील श्री रेणुकादेवी शरद सहकारी साखर कारखाण्याचा २०२६-२७ गळीत हंगाम समारंभ छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदिपान भूमरे यांच्या शुभहस्ते तालुक्याचे आमदार तथा रेणुकादेवी शरद सहकारी साखर कारखाण्याच चेअरमन विलास बापु भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली गव्हाणीत उसाची मोळी टाकून पार पडला यावेळी समस्त संचालक, ऊस उत्पादक शेतकरी, सभासद, कामगार मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी खासदार संदीपान भूमरे यांनी पंचक्रोशीतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या हक्काचा कारखाना म्हणून या कारखान्यास ऊस घालावे असे आवाहन करत तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा घेतला.

कारखाना यावर्षी ३ ते ३.५ लाख मे. टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे त्यासाठी कारखान्यामध्ये हार्वेस्टर वाहने खाली करण्यासाठी नवीन टिपलर, क्षमता वाढीसाठी एस के बॉडी, पॅन क्रीस्टयेडार, हिटर, सल्फर भट्टी, ऑलिव्हर इल्यादी प्रकारची नवीन मशिनरी बसवली आहे. त्यासाठी लागणारी पुरेशी व सक्षम अशी तोडणी वाहतूक यंत्रणा भरलेली आहे वाहतूक यंत्रणेला आपण सुमारे ६ ते ७ कोटी अँडवान्स वाटप केलेले आहे. तसेच भागातील सर्व ऊस उत्पादकांच्या उसाचे संपूर्ण गाळप केले जाईल असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजू नाना भुमरे, व्हाईस चेअरमन नंदू पठाडे, तज्ञ संचालक अप्पासाहेब निर्मळ, खरेदी विक्री संघाचे सभापती बाबुराव पडुळे, श्री रेणुकादेवी शुगर मिल्सचे चेअरमन दत्तात्रय रेवडकर, रोहिदास रेवडकर तसेच कार्यकारी संचालक नामदेव बालवडकर , जनरल मॅनेजर चंद्रकांत पाटील, दिलीप बोडखे, सुभाष गोजरे, अमोल थोरे, भारत पवार, अफसर शेख, संदीपान काकडे, नाना गाभूड, भारत लांडगे, ज्ञानदेव बढे, तसेच, प्रोडक्शन मैनेजर दिगांबर आवताडे, वर्क्स मॅनेजर महेश ढालपे, केन मॅनेजर सचिन आसबे, चिफ इंजिनिअर राजेंद्र चौधरी, चिफ केमिस्ट अशोक थोटे, चिफ अकौंटंट रमेश झिरपे, इलेक्ट्रिशियन फयाज शेख, डे. चिफ केमिस्ट संजय माने, स्टोअर किपर गणेश काळे, ऑ.सु श्रीमंत टेकाळे, गोडाऊन किपर सोमनाथ मुळे, विद्रद्याधर महाजन, धनंजय जाधव,

सह ऊस ऊस उत्पादक शेतकरी,सभासद, कामगार, तोडणी वाहतूकदार या गळीत हंगामास मोठया संख्येने उपस्थित होते.

विनानंबरच्या दुचाकी, मोठ्या आवाजाचे सायलन्सर

हिवरखेडा रोडवरील शर्मा टी स्टॉलजवळ कारवाई; शहरात ध्वनिप्रदूषण करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांची मोहीम

कन्नड :- दि.१४ ऑक्टोबर - शहरात कर्णकर्कश आवाज करणाऱ्या दुचाकींचा सुळसुळाट सुरू असतानाच कन्नड शहर पोलिसांनी अशा वाहनांविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. १३ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे १०.३० वाजता शहरातील हिवरखेडा रोडवरील शर्मा टी स्टॉलजवळून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या दोन दुचाकी पोलिसांनी ताब्यात घेतल्या. विशेष म्हणजे, या दोन्ही दुचाकींना नंबर प्लेट नसल्याचे समोर आले आहे.



शहरातील रस्त्यांवर मोठ्या आवाजाचे सायलन्सर लावून फिरणाऱ्या दुचाकींमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. शाळा, महाविद्यालये आणि वर्दळीच्या रस्त्यांवर अशा वाहनांचा आवाज ध्वनिप्रदूषणात भर घालतो. त्यातच नंबर प्लेट नसलेल्या दुचाकी शहरात फिरत असल्याने वाहनांची ओळख पटविण्याचाही प्रश्न निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी केलेल्या कारवाईला महत्त्व प्राप्त झाले आहे.

परिविक्षाधीन उपविभागीय पोलीस अधिकारी आरती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश दिंडे आणि पोलीस अंमलदार विनोद लोंढे यांनी ही कारवाई केली.

सायलन्सरचा आवाज वाढवला तर कारवाईला सामोरे जावे लागणार

कर्णकर्कश आवाज करणाऱ्या वाहनांविरोधात कन्नड शहर पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली आहे. शाळा, महाविद्यालये तसेच शहरातील रस्त्यांवर अशा प्रकारची वाहने आढळल्यास नागरिकांनी पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याने अशा दुचाकीस्वारांचे धाबे दणाणण्याची शक्यता आहे.

वाळू-मुरुम वाहतूक प्रकरणातील आरोपी चारचाकीसह हजर

कन्नड :- दि.१४ ऑक्टोबर - तालुक्यात अवैध वाळू-मुरूम वाहतुकीच्या कारवाईदरम्यान १ सप्टेंबर रोजी पोलिसांच्या अंगावर वाहन घातल्याच्या प्रकरणात तपास सुरू असतानाच पोलिसांना गुंगारा देणाऱ्या दोन आरोपींनी अखेर १३ ऑक्टोबरच्या रात्री पोलिसांसमोर शरणागती पत्करली. सत्र न्यायालय आणि उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर दोघेही एमएच २० एफपी ९०४८ क्रमांकाच्या चारचाकी वाहनासह हजर झाले.



योगेश ऊर्फ बंडू योगेश जनार्धन भोसले (वय ३४, रा. पळसगाव, ता. खुलताबाद) आणि रमेश ज्ञानेश्वर चव्हाण (वय २७, रा. सुलतानपूर) अशी आरोपींची नावे आहेत.

अवैध वाळू-मुरूम वाहतुकीवरील कारवाईदरम्यान घडलेल्या या घटनेनंतर पोलिसांकडून आरोपींचा शोध घेत तपास सुरू होता. दरम्यान, अटकेपासून संरक्षण मिळवण्यासाठी दोघांनी सत्र न्यायालयात धाव घेतली; मात्र तेथे अर्ज फेटाळण्यात आला. त्यानंतर उच्च न्यायालयातही अटकपूर्व जामिनासाठी प्रयत्न करण्यात आले. तेथूनही दिलासा न मिळाल्याने अखेर दोघांनी पोलिसांसमोर हजेरी लावली.

या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश दिंडे करीत आहेत. पोलिसांना गुंगारा देत असलेल्या आरोपींनी अखेर शरणागती पत्करल्याने या प्रकरणाच्या तपासाला आता पुढे कोणते वळण मिळते, याकडे लक्ष लागले आहे.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



जिंतुर सार्वजिनिक दुर्गामाता मंडळ, गणपती गल्ली येथील 15 फूट इंच मैशासून देवी पाहण्यासाठी महिलांनी गर्दी पहिला दिसत आहे. छाया - सचिन रायपत्रीवार

वनामकृवि आणि वामन फूड्स, वसमत यांच्यात सामंजस्य करार

करवंद उत्पादक शेतकरी, महिला बचत गट आणि नवउद्योजकांसाठी प्रक्रिया उद्योगाच्या नव्या संधी उपलब्ध होणार – कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पर्यायी उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी तसेच स्थानिक फळपिकांवर आधारित प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि वामन फूड्स, वसमत, जि. हिंगोली यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली हा करार करण्यात आला. या करारामुळे करवंद प्रक्रिया व मूल्यवर्धनावर आधारित उद्योगांच्या विकासाला चालना मिळणार असून, मराठवाड्यातील करवंद उत्पादक शेतकऱ्यांसाठी उत्पन्नवाढीच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

मराठवाड्यातील प्रतिकूल हवामान आणि दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी वसमत तालुक्यातील शेतकऱ्यांनी करवंद लागवडीला प्राधान्य दिले आहे. करवंदाचा वापर प्रामुख्याने प्रसिद्ध करवंद चेरी तयार करण्यासाठी केला जातो. मात्र, या फळापासून विविध मूल्यवर्धित पदार्थ तयार करून प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळवून देण्याची मोठी संधी उपलब्ध आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयातील शास्त्रज्ञांनी करवंदापासून विविध मूल्यवर्धित पदार्थ तयार करण्याचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. यामध्ये करवंद पेय, जाम, जेली, चेरी, करवंद गर, करवंद गराची भुकटी, करवंद मुखवास, चाट मसाला, करवंद गरापासून आईस कँडी, करवंद लोणचे, करवंद चटणी आणि करवंद वाईन यांसारख्या उत्पादनांचा समावेश आहे.

विद्यापीठाने विकसित केलेले करवंद प्रक्रिया व मूल्यवर्धनाचे तंत्रज्ञान शेतकरी आणि उद्योजकांपर्यंत पोहोचविणे, त्यातून नवीन प्रक्रिया उद्योग



उभारण्यास प्रोत्साहन देणे तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे हा या सामंजस्य कराराचा प्रमुख उद्देश आहे.

यानिमित्त माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि म्हणाले की, या सामंजस्य करारामुळे करवंद उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून आर्थिक प्रगती साधण्याची एक महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध होणार आहे. विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान उद्योजकांपर्यंत पोहोचल्यास करवंदासारख्या स्थानिक फळपिकाला अधिक बाजारमूल्य मिळू शकते. तसेच शेतकरी, महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि नवउद्योजकांना प्रक्रिया व मूल्यवर्धनाच्या क्षेत्रात स्वतःचे उद्योग सुरू करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होईल, असे प्रतिपादन माननीय कुलगुरू यांनी केले. शेतमालावर प्रक्रिया करून मूल्यवर्धित उत्पादने तयार केल्यास ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस मदत होऊ शकते. करवंद प्रक्रिया उद्योगासाठी करण्यात आलेला हा सामंजस्य करार भविष्यात विविध प्रकारच्या शेतमालावर आधारित प्रक्रिया उद्योगांच्या विकासासाठी प्रेरणादायी ठरेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

वसमत येथील वामन अन्नप्रक्रिया उद्योगाचे शेतकरी तथा उद्योजक श्री. सदाशिव अडकीने यांच्या उद्योगासोबत करण्यात आलेल्या या करारानुसार करवंद प्रक्रिया व मूल्यवर्धनाच्या क्षेत्रात तंत्रज्ञान हस्तांतरण, नवीन उत्पादनांचा विकास (प्रॉडक्ट डेव्हलपमेंट), पुढील संशोधन आणि प्रशिक्षण यासाठी दोन्ही संस्थांकडून सहकार्य करण्यात येणार आहे. तसेच शेतकरी बचत गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून या उत्पादनांचे विपणन व बाजारपेठेपर्यंत पोहोच वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

वामन फूड्स, वसमत येथील अन्नप्रक्रिया उद्योगात उपलब्ध असलेल्या सुविधांचा वापर करवंद प्रक्रिया व मूल्यवर्धनासंबंधी प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी करण्याची तरतूदही या करारात करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकरी, महिला बचत गट आणि नवउद्योजकांना प्रत्यक्ष प्रक्रिया तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या वेळी विद्यापीठाचे संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेश क्षीरसागर, विभागप्रमुख डॉ. कैलास गाडे, डॉ. जी. एम. माचेवाड, डॉ. एस. के. सदावर्ते, करवंद प्रक्रिया व मूल्यवर्धन संशोधन क्षेत्रातील शास्त्रज्ञ डॉ. जोशी, शिक्षण सहयोगी डॉ. देशमुख तसेच विद्यापीठातील इतर शास्त्रज्ञ व तज्ज्ञ मान्यवर उपस्थित होते.

या सामंजस्य करारामुळे करवंद प्रक्रिया व मूल्यवर्धनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात उद्योगविकास, रोजगारनिर्मिती आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत परभणी दौऱ्यावर

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी : छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत हे शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेणार आहेत. तसेच नागरिकांचे निवेदनेही स्वीकारणार आहेत.

या अनुषंगाने दि. १६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस सर्व विभागप्रमुख तसेच भूमिअभिलेख, नोंदणी व मुद्रांक शुल्क आणि महसूल विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बैठकीनंतर जिल्हाधिकारी कार्यालय येथे नागरिकांना त्यांच्या विविध समस्या, तक्रारी आणि मागण्यांसंदर्भात विभागीय आयुक्तांकडे निवेदने सादर करता येणार आहेत.

माणुसकी जपत रामा भाऊ मुळे यांचा वाढदिवस; उर्मी आश्रमात अन्नदान, शालेय साहित्याचे वाटप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : रामराज्य ग्रुप महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष रामा भाऊ मुळे यांचा वाढदिवस सातारा परिसरातील उर्मी आश्रमात अन्नदान आणि शालेय साहित्याचे वाटप करून साजरा करण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत गरजू व्यक्तींना मदतीचा हात देत या उपक्रमातून माणुसकीचा संदेश देण्यात आला. वाढदिवसानिमित्त केवळ उत्सव साजरा न करता गरजू व्यक्तींना अन्नदान करण्यात आले, तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. समाजातील गरजू व्यक्तींना मदत करणे, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि त्यांच्याप्रती आपुलकीची भावना जपणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. 'वाढदिवसाचा खरा आनंद दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यात आहे,' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजात प्रेम, आपुलकी आणि सेवाभाव वाढण्यास मदत होते. या उपक्रमाचे आयोजन विशाल (बंटी) दांडगे यांनी केले. यावेळी सत्येंद्रजी पांडे, संजय चव्हाण, जितेश राठोड आणि अजिंक्य चव्हाण यांच्यासह मित्रपरिवारातील सदस्य उपस्थित होते. गरजू व्यक्तींना मदत करून सामाजिक जबाबदारी जपण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

शांताबाई वाघमारे यांचे निधन



जिंतूर / प्रतिनिधी शहरातील आदर्श नगर मध्ये राहणाऱ्या जेष्ठ महिला ग.भा.शांताबाई रंगनाथराव वाघमारे वय 82 वर्ष यांचे वृद्धपकाळाने बुधवार दि 14 ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर रात्री 9 वाजता शहरातील सार्वजनिक समशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात एक मुलगा,तीन मुली,जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे त्या उप शिक्षणाधिकारी परभणी तथा गट शिक्षणाधिकारी सेलू गजानन वाघमारे यांच्या आई होत

माहूर गडाचे उपपीठ राणीसावरगाव चे रेणुका माताच्या दर्शनासाठी नवरात्रात भाविकांची अलोट गर्दी

मुस्लिम कुटुंबाकडे देवीला तांबूल अर्पण करण्याचा मान; धर्म सर्व भावाचा वारसा येथे जपला

हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार

परभणी/**गंगाखेड तालुक्यातील राणीसावरगाव येथे माहूरच्या रेणुका मातेचे उपपीठ म्हणून प्रसिद्ध असलेले जागृत देवस्थान गोमती नदीच्या काठावर बालाघाट डोंगरामध्ये बसलेले या देवस्थानात नवरात्र महोत्सवाच्या काळात हजारो भावी वेगवेगळ्या भागातून दर्शनासाठी येत असतात विशेष म्हणजे धार्मिक परंपरे सोबतच सर्वधर्मसमभावाचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा वारसा जपण्याचे काम या मंदिर संस्थांनी केले आहे या मंदिराचे वाचतो हेमाडपंती स्थापत्य शैलीतील असून मंदिरात रेणुका मातीची तांदळाची स्वयंभू मूर्ती आहे देवी वरील श्रद्धेमुळे पंचक्रोशी सह जवळच्या आठही जिल्ह्यातून भाविक पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लावतात व आपली इच्छापूर्ती व नवस्फूर्तीसाठी महिला परडी भरण्याची परंपरा आहे ते पाहायला मिळते आहे आलेल्या गर्दीमुळे भाविकांच्या सोयी सुविधेसाठी मंदिर संस्थांच्या वतीने भक्तांची चौक व्यवस्था ठेवण्यात आली आहे नाम मात्र भाड्या निवासाची व्यवस्था वगैरे 24 तास पिण्याचे पाण्याची व्यवस्था सुविधा सांस्कृतिक अध्यात्मिक कार्यक्रमासाठी मंगल कार्यालय उभारण्यात आले आहे तीर्थक्षेत्र विकास योजनेतूनही काही विकास कामे करण्यात आले आहेत भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता तुळजापूरच्या धरतीवर देवस्थानचा विकास करावा अशी मागणी येथील विश्वस्ताकडून केली जात आहे या देवस्थानाचे वैशिष्ट्य म्हणजे नवरात्रीतील नवमीला देवीच्या मूर्तीवर बोकडाचा बळी देण्याची परंपरा आहे इथे होमवनानंतर विद्युत पूजा केली जाते या विधीचा मान धनगर आणि हटकर समाजाला आहे देवीची पालखी उचलण्याचा मान भोई समाजाला आहे तर मशाली नेण्याचा मान नावी समाजाला आहे वर्षभर देवीला प्रसाद रूपाने तांबूल अर्पण करण्याचा मान गावातील मुस्लिम कुटुंबाकडे आहे विविध समाधानांना धार्मिक परंपरेचे मनाचे स्थान देण्याची पद्धत सामाजिक सौलुकाची एक आदर्श उदाहरण आहे. विजयादशमीच्या दिवशी देवीची पालखी वाजत गाजत गावातून मिरविली जाते व पालखी डोंगरावरील मूळ पिठापर्यंत नेल्यानंतर दुसऱ्या दसरा साजरा केला जातो गावातील प्रत्येक घरामध्ये पालखीचे औक्षण केले जाते त्यानंतर सिमोउल्लंघन करून परतलेल्या कुटुंबीयांचे औक्षण करण्याची परंपरा आजही राणीसावरगाव च्या देवी भक्तांनीजपली आहे श्रद्धा आणि परंपरा आणि सामाजिक एकात्मिकतेच्या संगम म्हणजे हे माहूरचे उपपीठ राणीसावरगाव रेणुका माता देवी मंदिर देवस्थान नवरात्र महोत्सवात भाविकांचे प्रमुख आकर्षण ठरते व भाविकांची गर्दी ही भक्तांची मांदियाळी ठरते आजच्या या कलियुगामध्ये समभाव एकात्मता समानतेचे प्रतिक म्हणून या मंदिर संस्थान कडे पाहिले जाते.

विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, स्वयंम योजना प्रवेश प्रक्रियेसाठी मुदतवाढ

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: जिल्ह्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास वर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी व योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचा लाभ घेण्याकरिता सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात नव्याने प्रथम वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज करण्यासाठी दि.30 ऑक्टोबरपर्यंत अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्यामुळे तालुक्यांच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयात व्यवसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात नव्याने प्रथम वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी सदरील योजनांचा लाभ घेण्याकरिता दि. 30 ऑक्टोबरपर्यंत ऑफलाईन प्रवेश अर्ज कार्यालयास सादर करावेत. तसेच आधार व स्वयंम योजनेअंतर्गत नूतनीकरणाचे अर्ज भरण्याबाबत स्वतंत्रपणे सूचना देण्यात येतील. त्यामुळे सद्यस्थितीत नव्याने प्रथम वर्षास प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांनीच ऑफलाईन अर्ज भरुन कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक रामेश्वर मुंडे यांनी केले आहे.

भागपूर उपसा सिंचन योजनेत सोयगाव तालुक्यातील गावांचा समावेश करा- इद्रिस मुलतानी

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव, दि.१४ ऑक्टोबर - जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यासाठी सुरू असलेल्या भागपूर उपसा सिंचन योजनेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील गावांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

भागपूर उपसा सिंचन योजनेचे काम जामनेर तालुक्यातील जलसंपदा विभागामार्फत सुरू असून, या योजनेच्या माध्यमातून सोयगाव तालुक्यातील काही गावांमधून पाइपलाइन जात आहे. मात्र, या गावांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याची बाब इद्रिस मुलतानी यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

सदरील योजना ही तापी नदीच्या शेळगाव बॅरेज मधून ते पाणी पावसाळ्यात भागपूर धरणात साठवणार,

7 PMC पाणी पावसाळ्याच्या नंतरच्या कालावधीत सदरची पाणी भातपूर धरणातून उचलून जामनेर तालुक्यातील कोरडे झालेल्या लघु प्रकल्प व पाजर तलावावर सोडणार आहे आणि त्यावर साधारणता 2200 कोटी रुपये खर्च होणार आहे आणि त्या योजनेत आमच्या तालुक्याचा समावेश करा यासंदर्भात लवकरच मंत्री गिरीश महाजन माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेणार.

या योजनेत सोयगाव तालुक्यातील पळसखेडा (महानोर), वरखेडी बुद्रुक, वरखेडी खुर्द, जंगला तांडा, फर्दापूर,



फर्दापूर तांडा, जामठी,पिंपळा, रवळा आणि जवळा या गावांमधून पाइपलाइन जात आहे. तसेच मूर्ती, घाणेगाव तांडा, मोलखेडा, हिवरी, नांदातांडा, देव्हारी, सावळदबारा, टिटवी आणि मोलखेडा या गावाच्या शेजारून सदरील योजनेचे काम सुरू आहे.

या परिसरातील अनेक गावांना पाण्याची मोठी गरज असून, योजनेच्या पाइपलाइनचा मार्ग या गावांमधून जात असतानाही स्थानिक शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळत नाही. त्यामुळे सोयगाव तालुक्यातील संबंधित गावांचा भागपूर उपसा सिंचन योजनेत समावेश करून येथील शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या भागपुर योजनेतून जसे जामनेर तालुक्यातील कोरडे पाझर तलाव पाण्याने भरणार आहे तसेच त्या पद्धतीने सोयगाव तालुक्यातील सुद्धा कोरडे झालेले पाझर तलाव भरण्यात यावे यामुळे सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाल्यास शेतीच्या उत्पादनात वाढ होऊन परिसराच्या कृषी विकासाला चालना मिळेल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून शासनाने या मागणीची सकारात्मक दखल घ्यावी व संबंधित गावांचा योजनेत समावेश करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, अशी विनंती इद्रिस मुलतानी यांनी केली आहे.

या मागणीमुळे सोयगाव तालुक्यातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दृष्टीने आशा निर्माण झाली असून, शासन याबाबत काय निर्णय घेते, याकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. मंत्री गिरीश महाजन यांनी या मागणीवर सकारात्मक प्रतिक्रिया देत, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करून या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यामुळे सोयगाव तालुक्यातील संबंधित गावांना सिंचनाचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल पडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे

जिंतूर तालुक्यात अवैध सावकारीचा विळखा घट्ट; सर्वसामान्यांचे संसार उद्ध्वस्त, एका सराफ व्यापाऱ्याला गाव सोडण्याची वेळ

केवळ 12 अधिकृत सावकार, शेकडो बेकायदेशीर; फायनान्सच्या नावाखाली सुरु आहे लूट; पीडितांनी लेखी तक्रार करावी - सहकार निबंधक नांदापूरकर यांचे आवाहन

जिंतूर (जि. परभणी) प्रतिनिधी : जिंतूर तालुक्यात सध्या अवैध सावकारीने डोके वर काढले आहे. शहरासह बोरी, चारठाणा, येलदरी, इटोली, आडगाव, बामणी, भोगाव, वागदरवाडी या मोठ्या गावांमध्ये शेती, लग्न, आजारपण आणि शिक्षणासाठी गरजू लोकांना हाताशी धरून अव्वाच्या सव्वा व्याज आकारले जात आहे. 10 टक्क्यांपासून ते 20 टक्के प्रतिमहिना इतके चक्रवाढ व्याज लावून सर्वसामान्यांची आर्थिक लूट सुरू आहे.

वसुलीसाठी गुंडांचा वापर, दंडेलशाही

या अवैध सावकारांकडून केवळ व्याजच नव्हे, तर वसुलीसाठी गुंड प्रवृत्तीच्या लोकांना हाताशी धरून दमदाटी, शिवीगाळ, घरासमोर तमाशा करणे, कोऱ्या चेकवर आणि स्टॅम्प पेपरवर सह्या घेणे असे प्रकार सर्रास सुरू आहेत. कर्ज घेतलेल्या रकमेपेक्षा कित्येक पट व्याज वसूल करूनही मूळ रक्कम तशीच ठेवली जाते.

एका सराफ व्यापाऱ्याला गाव सोडून पलायन करावे लागले

या जाचाचे ताजे उदाहरण म्हणजे जिंतूर शहरातील एका प्रतिष्ठित सराफ व्यापाऱ्याचे आहे. अवैध सावकारांच्या सततच्या त्रासाला आणि दंडेलशाही वसुलीला कंटाळून या व्यापाऱ्याला अखेर आपले घरदार, दुकान सोडून गावातून पळ काढावा लागला आहे. त्याने घेतलेल्या रकमेपेक्षा दुप्पट-तिप्पट रक्कम परत करूनही त्याचा छळ थांबत नव्हता, असे नागरिकांतून बोलले जात आहे. या घटनेमुळे तालुक्यातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण आहे.

अधिकृत फक्त 12, अनधिकृत शेकडो

या प्रकरणी आम्ही सहकार निबंधक, सहकारी संस्था, जिंतूर कार्यालयात माहिती घेतली असता धक्कादायक वास्तव समोर आले. संपूर्ण जिंतूर तालुक्यात शासनमान्य *केवळ 12 अधिकृत सावकार* परवाना धारक आहेत. त्यामध्येही निम्म्याहून अधिक परवाने हे सोने तारण ठेवून कायदेशीर सावकारी करणाऱ्या सराफ व्यावसायिकांकडे आहेत. ते शासनाच्या नियमानुसारच व्याज घेतात आणि दरवर्षी त्यांचे हिशोब तपासले जातात.

मात्र प्रत्यक्षात शहरात आणि गावागावात फायनान्स, मायक्रो फायनान्स, रोजगार बचत गट आणि खाजगी सावकारीच्या नावाखाली शेकडो लोक बिनापरवाना हा व्यवसाय करत आहेत. त्यांनी सहकार विभागाची कोणतीही परवानगी घेतलेली नाही.

कायदा काय सांगतो?

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 नुसार, परवान्याशिवाय सावकारी करणे हा फौजदारी गुन्हा आहे. विनापरवाना सावकारी केल्यास 5 वर्षापर्यंत तुरुंगवास आणि दंडाची तरतूद आहे. तसेच परवाना असूनही जास्त व्याज आकारल्यास परवाना रद्द करण्याचा अधिकार सहकार निबंधकांना आहे.

प्रशासनाचे आवाहन - घाबरू नका, लेखी तक्रार करा

याबाबत सहकार निबंधक नांदापूरकर यांनी स्पष्ट केले की, "आमच्याकडे नोंद असलेल्या 12 परवानाधारकांचे आम्ही दरवर्षी ऑडिट करतो. पण अवैध सावकारांच्या विरोधात जोपर्यंत पीडित व्यक्ती समोर येऊन लेखी तक्रार देत नाही, तोपर्यंत आम्हाला कारवाई करणे अवघड जाते. लोक घाबरतात आणि तक्रार देत नाहीत, याचाच गैरफायदा हे अवैध सावकार घेतात."

"जर कोणाला अवैध सावकाराने त्रास दिला असेल, जास्त व्याज घेतले असेल, तर त्यांनी आमच्या कार्यालयात येऊन लेखी अर्ज द्यावा. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवून आम्ही संबंधित सावकारावर कडक कायदेशीर कारवाई करू आणि पोलिसात गुन्हाही दाखल करू," असे आश्वासन त्यांनी दिले.

तरी तालुक्यातील जनतेने अवैध सावकारांच्या जाळ्यात अडकू नये आणि अडकले असल्यास तात्काळ सहकार विभाग, जिंतूर किंवा स्थानिक पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे घवघवीत यश



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१४ ऑक्टोबर

संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आणि १५ मेडल्स जिंकले.

महाविद्यालयाचा विद्यार्थी वैभव शिंदे याने १५०० मीटर, ३००० मीटर व ६ किमी क्रॉस कंट्री या तीन स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून तीन सुवर्णपदके पटकावली. रोहन घुसिंगे याने २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक, तर १०० मीटर स्पर्धेत कांस्यपदक मिळवले.

तसेच इयत्ता बारावी विज्ञान शाखेतील रोहन घुसिंगे,अथर्व मानकर,पीयूष काटोले,ओम प्रेराव व ओम तेली या विद्यार्थ्यांच्या रिले संघाने ४ × १०० मीटर स्पर्धेत रौप्यपदक, तर ४ × ४०० मीटर स्पर्धेत कांस्यपदक पटकावले.

या यशाबद्दल सर्व खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार,उपराचार्य डॉ.रावसाहेब बारोटे तसेच कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील यांनी अभिनंदन केले. तसेच त्याला मार्गदर्शन डॉ.निलेश गाडेकर,प्रा.शेख तौफिक सर यांनी केले.त्यांच्या कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली आहे.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

जिद्द अन् कर्तृत्वावर वैशाली साळवे यांनी साकरले 'नवदुर्गेचे रुप!



छत्रपती संभाजीनगर, नवरात्रोत्सव म्हणजे आदिशक्तीच्या विविध रुपांचा उत्सव, स्त्रीशक्तीच्या अथांग सामर्थ्याचा आणि संघर्षाचा सन्मान! नवरात्रात आपण मंदिरांमधील देवीची पूजा करतो, मात्र समाजात अशा अनेक जिवंत 'नवदुर्गा आहेत. ज्या दुःखाच्या अन् संकटांच्या महिषासुराचा संहार करत स्वतःचे व आपल्या कुटुंबाचे अस्तित्व तेजाने उजळवून लावतात. अशीच एक अतिशय भावूक, जिद्दीची आणि प्रेरणादायी जीवनगाथा आहे, पैठणच्या कन्या अन् सध्या पंचायत समिती पैठण येथे परिचर म्हणून सेवेवर असलेल्या वैशाली राहुल साळवे (भद्रे) यांची.

पैठण येथील जायकवाडी पाटबंधारे विभागाचे सेवानिवृत्त कर्मचारी अमृतराव भद्रे यांची कन्या वैशाली यांचा विवाह २० एप्रिल २००४ रोजी पुणे जिल्ह्यातील दौंड येथील राहुल रामचंद्र साळवे यांच्याशी झाला होता. राहुल साळवे हे पुणे जिल्हा परिषद अंतर्गत दौंड पंचायत समिती कार्यालयात कनिष्ठ सहाय्यक (क्लर्क) या पदावर कार्यरत होते. लग्नानंतरची ९ वर्षे दोघांचा संसार अत्यंत सुखाचा, आनंदाचा आणि समाधानाचा सुरू होता. परंतु काळाच्या मनात काही वेगळेच होते. २६ जानेवारी २०१३ या प्रजासत्ताकदिनी एका भीषण अपघातामध्ये राहुल साळवे यांचे अकाली व दुर्दैवी निधन झाले. या घटनेने वैशाली यांच्यावर दुःखाचा डोंगरच कोसळला. हसतं-खेळतं घर एका क्षणात उद्ध्वस्त झाले.

पतीच्या अपघाती निधनानंतर वैशाली साळवे यांच्यासमोर सर्वात मोठे आव्हान होते ते म्हणजे अवघ्या दीड वर्षाची चिमुकली मुलगी 'प्रणाली'. पतीचे छत्र हरपल्यानंतर त्या आपल्या आई-वडील आणि भावाकडे पैठण येथे राहू लागल्या. माहेरच्या भक्कम पाठिंब्यामुळे व आई-वडिलांच्या आधाराने त्यांनी स्वतःला सावरले. स्वतःच्या अश्रूंना वाट न देता, केवळ दीड वर्षाच्या लेकीच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी रणरागिणीसारखे लढण्याचे ठरवले.

हताश न होता परिस्थितीशी दोन हात करत वैशाली साळवे यांनी शासकीय सेवेसाठी प्रयत्न सुरू केले. अखेर १ जानेवारी २०१६ रोजी पतीच्या जागेवर अनुकंपा तत्त्वावर त्यांची नियुक्ती दौंड तालुक्यातील देऊळगावराजे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात 'परिचर' म्हणून झाली. दुःखाच्या गर्तेतून बाहेर पडत त्यांनी आपल्या सेवेला सुरुवात केली आणि कामालाच ईश्वर मानून प्रामाणिकपणे नोकरी बजावली. काही काळ देऊळगावराजे येथे सेवा बजावल्यानंतर, मुलीचे शिक्षण व कौटुंबिक सोय लक्षात घेता त्यांनी पैठण येथील पंचायत समिती कार्यालयात आपली बदली करून घेतली. सध्या त्या पंचायत समिती पैठण येथे परिचर म्हणून अतिशय तत्परतेने, नम्रतेने आणि चिकाटीने आपले कर्तव्य बजावत आहेत.

आईने अनुभवलेला त्याग, अपार कष्ट व दाखवलेली जिद्द आज फळास येत आहे. ती दीड वर्षाची चिमुकली 'प्रणाली' आज मोठी झाली असून पैठण येथे ११ वी सायन्स (विज्ञान शाखा) मध्ये शिक्षण घेत आहे. आईच्या अथांग संघर्षाची जाणीव ठेवून प्रणालीही अभ्यासात उत्तम कामगिरी करत आहे.

समतेचा विचार, बुद्धांचा धम्म; ज्ञान संदीपमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात!

डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा जागर विद्यार्थ्यांमध्ये; सांस्कृतिक कार्यक्रमांनी वेधले लक्ष

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचा संदेश देणाऱ्या ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम हायस्कूलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करत विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक सादरीकरणातून धम्माचा संदेश दिला.

डॉ. आंबेडकर नगर, सिडको येथील विद्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाशराव सोनवणे, सचिव खिल्लारे मॅडम आणि मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांच्या उपस्थितीत तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यानंतर प्रमुख पाहुणे, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी त्रिसरण, पंचशील व बौद्ध वंदना ग्रहण केली. शांत आणि मंगलमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमातून धम्माच्या मूल्यांचे स्मरण करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता पहिलीतील चिमुकल्यांनी सादर केलेल्या नृत्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रत्नमाला घोरपडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीत सादर करून वातावरणात प्रेरणादायी रंग भरले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाशराव सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. ही ऐतिहासिक घटना केवळ धर्मांतरापुरती मर्यादित नसून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाच्या मूल्यांवर आधारित जीवनपद्धतीचा स्वीकार करणारी क्रांती होती, असे त्यांनी स्पष्ट केले.

बाबासाहेबांचा 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा संदेश विद्यार्थ्यांनी जीवनात उतरवावा, असे आवाहन त्यांनी केले. शिक्षणाच्या बळावरच व्यक्ती स्वतःची प्रगती साधून समाजाच्या विकासात योगदान देऊ शकते. नियमित अभ्यास, शिस्त, चांगले चारित्र्य आणि सामाजिक जाणीव या गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांनी आपले भविष्य घडवावे. अनेक अडचणींवर मात करून उच्च शिक्षण मिळविणाऱ्या बाबासाहेबांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थ्यांनी जिद्दीने पुढे जावे, असेही त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा ऐतिहासिक संदर्भ सोप्या भाषेत समजावून सांगितला. भगवान बुद्धांनी सारनाथ येथे पहिले प्रवचन देऊन धम्मचक्र गतिमान केले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे बौद्ध धम्माचा स्वीकार करून या विचारांना नव्या सामाजिक परिवर्तनाची दिशा दिली, असे त्यांनी सांगितले.

करुणा, मैत्री, अहिंसा, सत्य आणि शील ही बुद्धांच्या शिकवणीतील मूल्ये विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात अंगीकारावीत, असे आवाहनही त्यांनी केले. पंचशीलाचे पालन केल्याने व्यक्तीचे जीवन अधिक शिस्तबद्ध होण्यासोबतच समाजात शांतता आणि सलोखा निर्माण होतो. आई-वडील व शिक्षकांचा आदर करणे, सर्वांशी प्रेमाने वागणे, अंधश्रद्धा आणि भेदभावापासून दूर राहणे तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. बाबासाहेबांच्या विचारांनुसार आचरण केल्यास संविधानातील समता आणि बंधुतेची मूल्ये प्रत्यक्ष जीवनात रुजवता येतील, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुनील चौधरी, हर्षल पगारे, किरणकुमार सोनवणे, विजय पाटील, साहेबराव शिंदे, शितल घुगे आणि वैशाली बागुल आढाव यांनी परिश्रम घेतले. इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनी मोनिका मगरे आणि ऋतुजा आळींग यांनी सूत्रसंचालन केले, तर वैशाली बागुल यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर संस्थेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना बुंदीचे वाटप करण्यात आले. बुद्धांचा करुणेचा संदेश आणि बाबासाहेबांच्या समतेच्या विचारांचे स्मरण करत हा सोहळा उत्साहात पार पडला.

परभणी जिल्ह्यात 21 ऑक्टोबरपासून विशेष आर्थिक समावेशन मोहीम

प्रत्येक गावात बँकिंग शिबिराचे आयोजन; डिजिटल बँकिंग सुरक्षिततेवर भर

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी,: केंद्र शासनाच्या अर्थ मंत्रालयाच्या निर्देशानुसार परभणी जिल्ह्यात 21 ऑक्टोबर ते 31 डिसेंबर 2026 दरम्यान विशेष आर्थिक समावेशन मोहीम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पात्र नागरिकाला बँकिंग सेवांशी जोडून घेण्यासाठी प्रत्येक गावात बँकिंग शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी सांगितले.

या विशेष मोहिमेत शासकीय विमा व पेन्शन योजनांचा लाभ मिळवून देणे आणि आर्थिक समावेशनाची व्याप्ती वाढविणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. जिल्हा प्रशासन, जिल्हा अग्रणी बँक कार्यालय आणि जिल्ह्यातील सर्व बँकांच्या समन्वयातून ही मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत बँकिंग सुविधांपासून वंचित नागरिकांना बँकिंग व्यवस्थेशी जोडणे, बँक खात्यांशी संबंधित प्रलंबित कामे पूर्ण करणे, विमा संरक्षण व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आणि डिजिटल बँकिंगच्या सुरक्षित वापराबाबत जनजागृती करणे यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

मोहिमेदरम्यान प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि अटल पेन्शन योजनांमध्ये पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. तसेच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेच्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यांशी आधार क्रमांक जोडण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. यामुळे पात्र नागरिकांना विमा संरक्षण व सामाजिक सुरक्षेच्या योजनांचा लाभ मिळविण्यास मदत होणार आहे.

प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत नवीन बँक खाती उघडणे, विशेषतः असुरक्षित आदिवासी समूहातील कुटुंबांना बँकिंग सेवांशी जोडणे आणि निष्क्रिय झालेली जनधन खाती पुन्हा कार्यरत करणे यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. याशिवाय जनधन तसेच इतर बचत खात्यांचे पुनःकेवायसी पूर्ण करणे, प्रलंबित खात्यांसाठी केंद्रीय केवायसी ओळख क्रमांक निर्माण करणे आणि बचत खाती, लॉकर व इतर बँकिंग सुविधांमधील नामनिर्देशनाचे तपशील अद्ययावत करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

डिजिटल आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी विशेष जनजागृती सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. ऑनलाइन आर्थिक व्यवहार करताना घ्यावयाची काळजी, ओटीपी, पिन, पासवर्ड आणि सीव्हीव्ही यांची गोपनीयता राखण्याचे महत्त्व तसेच संशयास्पद लिंक, फोन कॉल आणि संदेशांपासून सावध राहण्याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याद्वारे सायबर आर्थिक फसवणुकीपासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. विशेष आर्थिक समावेशन मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक गावात बँकिंग शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. आर्थिक साक्षरतेबाबत मार्गदर्शन करणे या बाबींना प्राधान्य दिले जाणार आहे.

नागरिकांनी मोहिमेचा लाभ घ्यावा

जिल्ह्यातील नागरिकांनी २१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत आपल्या बँक खात्याचे पुनः-केवायसी, आधार जोडणी, केंद्रीय केवायसी ओळख क्रमांक, नामनिर्देशन तसेच विमा व पेन्शन योजनांमधील नोंदणीसंदर्भातील प्रलंबित कामे पूर्ण करून घ्यावीत. पात्र नागरिकांनी आपल्या गावात आयोजित करण्यात येणाऱ्या बँकिंग शिबिरांमध्ये सहभागी होऊन या मोहिमेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण आणि जिल्हा अग्रणी बँक कार्यालय, परभणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

'बामू'मध्ये छाऊ नृत्याचे धडे; 18 ला विशेष सादरीकरण

प्रसिद्ध छाऊ गुरु भूमिकेश्वर सिंह यांच्याकडून विद्यार्थ्यांना पारंपरिक रंगकलेचे प्रशिक्षण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सादरीकरण कला विभागात (नाट्यशास्त्र) छाऊ नृत्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ९ ते १८ ऑक्टोबरदरम्यान सुरू असलेल्या या दहा दिवसीय कार्यशाळेत प्रसिद्ध रंगमंच दिग्दर्शक आणि छाऊ नृत्य गुरू भूमिकेश्वर सिंह विद्यार्थ्यांना भारतीय पारंपरिक रंगकला आणि छाऊ नृत्याचे प्रशिक्षण देत आहेत. या कार्यशाळेचा समारोप १८ ऑक्टोबर रोजी विशेष सादरीकरणाने होणार आहे.

भारतीय पारंपरिक रंगकलेचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा आणि छाऊ नृत्याच्या समृद्ध परंपरेची ओळख व्हावी, हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे. दररोज सकाळी ७ ते ९ या वेळेत प्रशिक्षण सुरू असून, विद्यार्थ्यांना छाऊ नृत्यातील शारीरिक हालचाली, आंगिक भाषा, अभिनय, मुखवट्यांचा वापर, लय-ताल आणि पारंपरिक रंगमंचीय अभिव्यक्ती यांचे प्रात्यक्षिकांसह धडे दिले जात आहेत. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, छाऊ नृत्याविषयी त्यांच्यात कुतूहल निर्माण झाले आहे.

भूमिकेश्वर सिंह यांना प्रदीर्घ अनुभव

भूमिकेश्वर सिंह यांना रंगमंच आणि दिग्दर्शन क्षेत्रातील योगदानासाठी उत्तर प्रदेश संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. त्यांनी नवी दिल्ली येथील श्रीराम सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्समधून अभिनयाचे प्रशिक्षण घेतले आहे.

शाहनूरवाडीत 16 ते 18 ऑक्टोबरदरम्यान भव्य चंडी होम महोत्सव

साडेतीन शक्तिपीठांच्या दर्शनाची संधी; भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : द आर्ट ऑफ लिव्हिंग आणि वैदिक धर्म संस्थानच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त १६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान भव्य चंडी होम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शाहनूरवाडी येथील गुरुकुल शाळेमागील त्रिलोक सिंह जबिंदा लॉन्स येथे हा महोत्सव होणार आहे.महोत्सवात वैदिक पद्धतीने महागणपती होम, नवग्रह होम, रुद्र होम आणि महा चंडिका होम होणार आहे. यासाठी बेंगळुरू येथील द आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वेदपाठशाळेतील स्वामीजी आणि पंडित उपस्थित राहणार आहेत. दररोज पूजेदरम्यान सत्संगाचेही आयोजन करण्यात आले आहे.या महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांच्या मूर्तींचे दर्शन. भाविकांसाठी फराळ आणि महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. १८ ऑक्टोबर रोजी दुपारी १२.३० वाजता चंडी होमाची पूर्णाहुती, तर दुपारी १ वाजता महाप्रसाद वितरण होईल.पत्रकार परिषदेत डॉ. अजित हजारी, शिवशंकर स्वामी, नंदकिशोर औटी, संजय भालेकर, प्रभंजन महातोले, अनिल देशमुख आणि देवेन लढ्ढा यांनी महोत्सवाची माहिती दिली.

महागाई गगनाला पोहोचल्यामुळे सर्व सामान्य जनता हैरान

हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार



परभणी**या दुष्काळाच्या काळात महागाईचा दर गगनाला भिडल्यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झाली असून त्यामध्ये सर्वसामान्य नागरिकांचे जगणे दिवसेंदिवस कठीणच होत चालले आहे त्यांच्यापुढे जगावर किंवा मरावा हा प्रश्न भेडसावत असतानाच जीवनाच्या संघर्षाच्या या प्रवासात घरगुती खर्च किराणा खर्च भाजीपाला इंधन वीज बिल शिक्षणाचा खर्च आरोग्यावरील खर्च याचे नियोजन करताना अनेक माता भगिनीची दमछाक होत आहे उत्पन्न मर्यादित असताना खर्चाचा वाढता भार पेलवायचा कसा असा प्रश्न सर्वसामान्य जनता व नागरिकांसमोर उपस्थित झाला आहे. या भस्मासुर महागाईचा झळा मध्ये सर्वसामान्य कुटुंब वर पळून गेले आहे बेरोजगारीचा डोंगर उभा असल्याने रोजगारीसाठी मारामारी करत फिरावे लागते त्यामध्ये जेमतेम कामधंदा करून मिळालेली तुटपुंज रक्कम यामध्ये दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या वस्तूंच्या किमतीमध्ये भरमसात वाढ झाल्याने जाणीव आता सर्वसामान्य होत आहे बाजारात खरेदीसाठी गेल्यानंतर खिशाचा विचार करून वस्तू घ्यावा लागत आहेत पूर्वी ठराविक रकमेत होणारी खरेदी आता याच रकमेत पूर्णपणे दुप्पट वाढ झाल्याने पूर्वीच्या या कमी रकमेमध्ये होणाऱ्या कुटुंबाच्या आर्थिक नियोजनाचे गणित आता विस्कळीत होत असून सर्वसामान्यांच्या संसाराची घडी आता विस्कीटच चालली आहे नोकरदार नोकरदारांच्या महिन्याच्या सुरुवातीलाच आपल्या पगारीचा मोठा हिस्सा घर भाडे किराणा मुलाचे शिक्षण व इतर आवश्यक घर खर्चावर होतो यासाठी त्यामुळे बचतीसाठी त्यांच्या हातात पैसे शिल्लक राहणे कठीण बनत चालले आहे विशेषता रोजदारीवर काम करणारे मजूर अल्प उत्पन्न गटातील कुटुंबी आणि छोटी व्यवसाय यांच्यावर परिस्थितीच्या अधिक तान पडू शकतो महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने बाजारभावावर लक्ष ठेवावे व साठी बाजी व काळाबाजार रोखावा आणि सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरामध्ये जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्यात याव्या प्रभावी उपाययोजना कराव्यात अशा अपेक्षा सर्वसामान्य नागरिकाकडून व्यक्त केले जात आहेत महागाईचा प्रश्न केवळ बाजार भाव पुरताच मर्यादित नसून तो सर्वसामान्य माणसाच्या जगण्याच्या व मरण्याची जोडलेला आहे त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा देण्यासाठी खूप उपाययोजना सरकार कधी करणार का नुसते आश्वासन देऊन आश्वासनाच्या हवेवरच जनतेला ठेवणार हा

वेटलिफ्टिंग व बॉडीबिल्डिंगमध्ये संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचा दबदबा कायम; 10 सुवर्ण, 4 रौप्य, 1 कांस्य पदकांसह युनिव्हर्सिटी बेस्ट लिफ्टरचा बहुमान

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.१४ ऑक्टोबर - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग व बॉडीबिल्डिंग स्पर्धा २०२६-२७ या बदनापूर कॅम्पस येथे उत्साहात पार पडल्या.या स्पर्धेत संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील वर्चस्वाची परंपरा कायम राखली.

या स्पर्धेत महाविद्यालयाने एकूण १० सुवर्ण, ४ रौप्य व १ कांस्य पदक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. यासोबतच महाविद्यालयाच्या खेळाडूने युनिव्हर्सिटी बेस्ट लिफ्टर हा मानाचा बहुमान पटकावला.

वेटलिफ्टिंगमध्ये ११ पदकांची कमाई :

वेटलिफ्टिंग स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत एकूण ११ पदके मिळवली.मुलींच्या वेटलिफ्टिंग स्पर्धेतही महाविद्यालयाच्या खेळाडूंनी दोन सुवर्णपदके पटकावत महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला.

बॉडीबिल्डिंगमध्ये दोन सुवर्णपदके :

बॉडीबिल्डिंग स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी दोन सुवर्णपदके मिळवून आपले कौशल्य सिद्ध केले.

गेल्या ११ वर्षांपासून वेटलिफ्टिंग व बॉडीबिल्डिंग या क्रीडा प्रकारांत संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाने आपले वर्चस्व आणि यशाची परंपरा कायम राखली आहे. खेळाडूंची मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि योग्य मार्गदर्शन यामुळे महाविद्यालयाने पुन्हा एकदा विद्यापीठ स्तरावर आपली छाप उमटवली.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य शिरीष पवार,उपप्राचार्य रावसाहेब बारोटे सह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

या खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा विभागप्रमुख डॉ. निलेश गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

जिंतूरमध्ये 'चालता बोलता' प्रश्नमंजुषेला उत्स्फूर्त प्रतिसाद

सामान्य ज्ञान, अध्यात्म, विज्ञान आणि व्यवहारज्ञानावर आधारित प्रश्न



जिंतूर : दुर्गेश्वरी युवती मंडळ, जिंतूर यांच्या वतीने नवरात्र महोत्सवानिमित्त मुली व महिलांसाठी आयोजित विविध स्पर्धांअंतर्गत 'चालता बोलता' प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेला मुली व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या स्पर्धेत सामान्य ज्ञान, अध्यात्म, विज्ञान तसेच दैनंदिन जीवनातील व्यवहारिक ज्ञानावर आधारित विविध प्रश्न विचारण्यात आले. मनोरंजक पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या प्रश्नमंजुषेमुळे स्पर्धकांच्या ज्ञानाची चाचणी घेण्याबरोबरच त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासही मदत झाली. सलग पाच प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या अश्विनी कटारे, कांचन काळे, शकुंतला काळे, नेहा काळे, रूपाली सोळंके, मंदा डूबे आणि अश्विनी सुकाळे या महिलांसह विद्या कटारे, विभा बाभनकर, आराध्या डूबे आणि श्रावणी रोकडे या मुलींना विशेष बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संध्या सचिन रायपत्रीवार आणि शामबाला वावरे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश डूबे यांनी केले. सामान्य ज्ञानासोबतच अध्यात्म, विज्ञान आणि व्यवहारज्ञानाची सांगड घालणाऱ्या या उपक्रमातून मुली व महिलांना ज्ञानाची देवाणघेवाण करण्याची आणि आत्मविश्वासाने उत्तरे देण्याची संधी मिळाली. दुर्गेश्वरी युवती मंडळाच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

नवरात्र महोत्सवानिमित्त मंडळाच्या वतीने आयोजित विविध स्पर्धांमधून मुली व महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासोबतच त्यांच्यातील आत्मविश्वास आणि बौद्धिक क्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911